# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक २५/२०१९** | **दिनांक २६/०३/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | डॉ. शितल यादव, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २०/०३/२०१९ ते २६/०३/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २७/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून ३१/०३/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०/०३ | २१/०३ | २२/०३ | २३/०३ | २४/०३ | २५/०३ | २६/०३ | | २७/०३ | २८/०३ | २९/०३ | ३०/०३ | ३१/०३ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३७ | ३२ | ३४ | ३३ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २४ | २१ | २१ | २२ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | १ | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६९ | ८६ | ६३ | ६५ | ७२ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३१ | ५१ | ४८ | ४६ | ५१ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | २ | ६ | ४ | ७ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | वा.उ. | वा.उ. | उ. | नै.द. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३५५८.३ |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २७ ते ३१ मार्च, २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रायगड जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक मध्यम स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | पोटरी अवस्था | • भात पिक पोटरी अवस्थेत असल्याने शेतामध्ये पाण्याची पातळी ५ ते १० सें. मी. पर्यंत ठेवावी. |
| भुईमुग | शेंगा अवस्था | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. |
| आंबा | फलधारणा अवस्था (गोटी ते सुपारी अवस्था) | • झाडांचे वाढत्या उन्हापासून संरक्षण करण्यासाठी झाडाच्या बुंध्याला बोर्डो पेस्ट (१ टक्के) लावावी.<br>• आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे गोटी व सुपारी एवढी असताना १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.<br>• तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत.<br>• फळे गोटी आकारचे असताना फळाचा आकार, फळाचे वजन फळामधील साका आणि फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी २५ x २० आकाराची बटर पेपर किंवा कागदी पिशवी लावावी.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. उन्हाळ्यात पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी द्यावे. |
| काजू | फलधारणा व पक्वता | • काजू पिकामध्ये काही ठिकाणी काढणी योग्य बी तयार झालेली आहेत. तयार झालेल्या बिया बोंडापासून वेगळ्या करून बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवाव्यात. तसेच विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करावेत.<br>• झाडांचे वाढत्या उन्हापासून संरक्षण करण्यासाठी झाडाच्या बुंध्याला बोर्डो पेस्ट (१ टक्के) लावावी.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने, कलमांच्या आळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यासाठी वाळलेले गवत, पालापाचोळा किंवा पोलीथीनचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना दर आठ दिवसांनी प्रती कलम १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. |
| नारळ | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी. |
| सुपारी | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, सुपारी बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| कांदा | वाढीची अवस्था | • कांदा पिकामध्ये ६ ते ८ दिवसांच्या अंतराने जमिनीच्या मगदुरानुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फलधारणा | • तापमानात वाढ संभवत असल्याने, फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी पाण्याचा हौद किंवा टाकी पंधरा दिवसांतून एकदा संपूर्ण कोरडी करून त्याला आतून चुना लावावा. त्यामुळे शेवाळ वाढ होण्यास प्रतिबंध होवून पाणी थंड राहून त्यातून कॅल्शियमचाही पुरवठा होण्यास मदत होईल.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• जनावरांना पायलाग रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे.<br>• पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.
अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा